MHBI100018242025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४४६/२०२५**
**आशाबाई अशोक सारुक व इतर**
**वि. निरंक**

**निशाणी क्र.१ वरील आदेश**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज न्यायालयांनी मालमत्तेच्या वारसांना मृत्युपत्र, व्यवस्थापकांना आणि प्रबंधकांना यथानियम मान्यता देण्याबाबत आणि प्रबंधकांची व व्यवस्थापकांची नेमणुक करण्यासंबंधी तरतुद करण्याबाबत विनिमय (बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७) मधील कलम २ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार, मयत अशोक पि. जालिंदर सारुक हे दिनांक १६.०८.२०२५ रोजी एस.आर.टी.मेडीकल कॉलेज, अंबाजोगाई येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी अर्जात असे नमूद केले आहे की, मयत अशोक पि. जालिंदर सारुक यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे, अर्जदार क्र.२ ही मुलगी आहे, अर्जदार क्र.३ हा मुलगा असुन अर्जदार क्र.४ व ५ हे मयताचे आई–वडील आहेत. मयत अशोक पि. जालिंदर सारुक यांच्या पश्चात्त अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. शासकीय, निमशासकीय, जमीनीचे कागदोपत्री नोंदीचे कामासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१ आशाबाई भ्र. अशोक सारुक यांचे पुराव्याचे शपथपत्र (निशाणी क्र.१४) येथे दिलेले आहे. सोबत अर्जदाराने मयत अशोक पि. जालिंदर सारुक यांचे मुळ मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी क्र.१८) व

अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या आधारकार्डच्या पडताळणी प्रती दाखल केलेल्या आहेत.

४. अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकूराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र ''संकेत'' च्या दि. ११.१२.२०२५ च्या आवृत्तीत प्रसिध्द केली गेली व त्याची प्रत निशाणी क्र.१३ वर दाखल केली आहे. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार क्र.१ ने निशाणी क्र.१४ वर स्वतःचे शपथपत्र दाखल केले. त्यांची साक्ष ही उलट तपासाविना असल्यामुळे अबाधीत आहे. शपथपत्रातील केलेले अभिकथन हे अर्जातील नमूद कथनांस मिळते जुळते आहे. अर्जदाराचा पुरावा असे दर्शवितो की, मयत अशोक पि. जालिंदर सारुक हे सारुकवाडी ता. केज, जि.बीड येथील रहिवाशी होते व ते दि.१६.०८.२०२५ रोजी अंबाजोगाई, जि.बीड येथे मयत झाले असून मयत अशोक हे अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र.२ व ३ चे वडील व अर्जदार क्र.४ व ५ यांचा मुलगा होता.

५. वारस प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीबाबत मयत व्यक्तिचे अथवा तिच्या वारसांचे मालकी हक्क ठरविण्यासाठी प्रदान केले जात नसून, केवळ एखादी व्यक्ती ही मयत व्यक्तिची वारस आहे किंवा नाही हे ठरविण्यापर्यंतच मर्यादीत आहे. अर्जातील कथन तोंडी व कागदोपत्री पुरावा इत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत अशोक पि. जालिंदर सारुक यांना त्यांच्या पश्चात्त कायदेशीर वारस आहेत. त्यांच्याशिवाय इतर कोणीही वारस नाहीत म्हणून सदर पुरावा ग्राहय धरणे

योग्य होईल. सबब, असा निष्कर्ष काढण्यात येतो की, अर्जदार हे मयताचे ''वारसाचे प्रमाणपत्र'' मिळविण्यास पात्र आहेत, करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ आशाबाई भ्र. अशोक सारुक, २. दिपाली पि. अशोक सारुक, ३. आदित्य पि. अशोक सारुक ४. कांताबाई भ्र. जालिंदर सारुक व ५. जालिंदर पि. विठ्ठल सारुक हे मयत अशोक पि. जालिंदर सारुक यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.

३. सदर वारस प्रमाणपत्र मयताचे नावावर असलेली कोणतीही रक्कम उचलणेकामी वापरणे येवु नये.

४. अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by POURNIMA VIJAY CHAVAN
Date: 2026.05.02 17:19:17 +0530

केज. **(पी.व्ही.चव्हाण)**
दि. ०२.०५.२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 02.05.2026 |
| Transcribed on | : | --- |
| Checked & signed on | : | 02.05.2026 |

Sd/-

(M.A.Kulkarni),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.